

संभाजीनगरातील चॅप्टर ऑफ कॉस्ट ॲण्ड अकाऊंटतर्फे आयोजित चर्चासत्रात बोलताना अनिल सावे. व्यासपीठावर ए. एस. सिद्धू, सुनील देशमुख, धनंजय जोशी दिसत आहेत.

# शहराकडील स्थलांतराचा अर्थव्यवस्थेवर परिणाम -जोशी

संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी)- ग्रामीण भागातील लोक रोजगार मिळविण्याच्या उद्देशाने शहराकडे स्थलांतरित होत आहेत. त्याचा मोठा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे, असे मत कॉस्ट ॲण्ड अकाऊंट विषयाचे तज्ज्ञ धनंजय जोशी यांनी 'अर्थसंकल्पातील बदल' या विषयावरील चर्चासत्रात व्यक्त केले.

संभाजीनगरातील चॅप्टर ऑफ कॉस्ट ॲण्ड अकाऊंटस्तर्फे केंद्रीय अबकारी कर, सीमा शुल्क, सेवा शुल्क याबाबत 'नव्या बजेटमधील बदल' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. कॉस्ट अकाऊंट विषयातील तज्ज्ञ धनंजय जोशी यांनी यावेळी सांगितले की, शहरी भागाकडे ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने स्थलांतरित होत आहे. त्यामुळे शहरांची लोकसंख्या वाढत आहे व शहरी सुविधा अपुऱ्या पडून त्याचा ताण देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत आहेत. गेल्या अनेक वर्षांत देशात औद्योगिक क्षेत्रांत मोठी वाढ झाली नाही. जागतिक पातळीवर व्याजदर २ ते ५ टक्के आहे. तर हिंदुस्थानात तो ९ ते १० टक्के एवढा आहे. त्यामुळे आपल्या देशाला जागतिक पातळीवर स्पर्धा करणे अवघड जात आहे. आता जो रेल्वे अर्थसंकल्प जाहीर झाला. तो अतिशय असंतुलित स्वरूपाचा आहे. ३० टक्के रक्कम रेल्वे कर्मचाऱ्यांच्या पगारातच जाते तर केवळ १ टक्का रक्कम रेल्वेच्या विकासावर खर्च होते, असेही त्यांनी सांगितले.

या चर्चासत्राचे उद्घाटन मराठवाडा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अनिल सावे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीमा व उत्पादनशुल्क विभागाचे आयुक्त ए.एस. सिद्धू, कॉस्ट अकाऊंट विषयातील तज्ज्ञ व्ही.एस. दाते, एस.आर. भार्गव, ए.बी. नवल, संभाजीनगरचे चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटचे अध्यक्ष सुनील देशमुख, उपाध्यक्ष एस.आर. पिंपळे उपस्थित होते.

ए.एस. सिद्धू यांनी यावेळी सांगितले की, येणाऱ्या काळात सेवा शुल्क या विषयाला खूप महत्त्व येणार आहे. त्यामुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी सेवाशुल्क विषयाचा विशेष अभ्यास केल्यास भविष्यात त्यांना फायद्याचे ठरेल, असे सिद्धू यांनी सांगितले.